राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, पुणे यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक- १८/२०२६/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

तक्रारदार	जन माहिती अधिकारी	प्रथम अपिलीय अधिकारी
संजय मोरेश्वर बालटे	१) शासकीय जन माहिती अधिकार, महसूल नायब तहसीलदार, २) कुळ कायदा नायब तहसिलदार, तहसीलदार कार्यालय शिरूर ता. शिरूर, जि.पुणे.	अपिलीय अधिकारी, शिरूर तहसीलदार कार्यालय, तालुका शिरूर, जिल्हा पुणे.

(निर्णय दि. २७.०७.२०२६)

तक्रारदार यांनी दिनांक १९.०१.२०२६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ नुसार तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रारी मध्ये तक्रारदार यांनी द्वितीय अपील क्रमांक- २१५१+२१५२/२०१८/पुणे याप्रकरणी तक्रार दाखल करण्याची कारणे नमूद करताना तक्रारदार यांच्या मालकीच्या मौजे रांजणगाव येथील शेत जमीन सर्वे नंबर 152 संदर्भात त्यांचे तहसील कार्यालय शिरूर येथे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम मधील तरतुदीनुसार दाखल केलेल्या प्रकरणाचा तपशील नमूद केला असून यामध्ये त्यांच्या मालकीच्या जमीन प्रकरणी निर्णय घेताना त्यांच्यावर अन्याय झालेला असल्याने याप्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपील अधिकारी यांचे विरुद्ध 25 हजार रुपये दंड करण्यात यावा, प्रथम आपली अधिकारी यांचे विरुद्ध शास्ती करण्यात यावी, याप्रकरणी त्यांना दोन कोटी रुपये नुकसान भरपाई मिळावी आणि आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी केली नाही या कारणास्तव संबंधितावर गुन्हे दाखल करण्याची शिफारस करावी अशी मागणी केली आहे.

तक्रारदार यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपील क्रमांक २१५१+२१५२/२०१८/पुणे .प्रकरणी आयोगाने दिनांक २८ जुलै २०२३ रोजी सुनावणी घेऊन पुढील प्रमाणे आदेश पारित केले आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्तीचे १५ दिवसात नियमाप्रमाणे देय असलेली माहिती नोंदणीकृत टपालने /व्यक्तिशः विनामूल्य पुरवावी जी माहिती देता येत नाही त्याचे कारण कळवावे.

आयोगाच्या आदेशानंतर जन माहिती अधिकारी तथा अभिलेख लिपिक तहसीलदार कार्यालय शिरूर यांनी दिनांक ७.९.२०२४ चे पत्राद्वारे आपण मागणी केलेल्या मौजे रांजणगाव गणपती येथील जुना सर्वे नंबर 152 व गट नंबर 1044 या शेतजमिनी मधील एक काही देवराम लक्ष्मण वाघ यांची कोण म्हणून नोंद करणे संदर्भात तलाठी रांजणगाव गणपती यांनी दिनांक 1 9 1947 अन्वये मालक सदरात असलेल्या सर्व संबंधितास काढलेल्या नोटिसांच्या प्रती दोन त्या संदर्भात झालेल्या चौकशीचा अहवाल आणि ती झालेल्या निर्णयाच्या प्रती इत्यादी आरटीएस संचिका त्यावेळीही आढळली नाही तरी याबाबत दिलगिरी व्यक्त करत आहे असे कळविले आहे.यावरून असे दिसून येते की आयोगाच्य आदेशानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना वस्तुस्थिती दर्शक उत्तर दिले आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जासोबत त्यांच्या जमिनीच्या संदर्भात तहसीलदार शिरूर येथे दाखल केलेल्या दाव्या वरील निकाल पत्र तसेच या प्रकरणी शिरूर उपविभागीय कार्यालयाने दिलेला निर्णय तसेच या प्रकरणी अतिरिक्त विभागीय

आयुक्त पुणे विभाग पुणे यांनी दिलेल्या निर्णयाची प्रत जोडली आहे. सदर कागदपत्रे विचारात घेता तक्रारदार यांचे जमिनीच्या मालकी हक्क संदर्भातील गाऱ्हाणे असून याबाबत नियमानुसार त्यांनी महसूल प्राधिकरणामध्ये दाद मागितलेली आहे.

तक्रारदार यांचा तक्रार अर्ज, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७.०९.२०२४ च्या पत्राद्वारे कळवलेली वस्तुस्थिती व या प्रकरणी तक्रारदार यांनी तहसीलदार शिरूर, उपविभागीय अधिकारी शिरूर व अतिरिक्त विभागीय आयुक्त पुणे यांचेकडील दाखल केलेल्या दावा प्रकरणी दिलेले निर्णय विचारात घेता तक्रारदार यांची तक्रार प्रशासकीय स्वरुपाची असल्याचे दिसून येते. याबाबत त्यांनी संबंधित वरिष्ठ सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने रिव्हयु पिटीशन क्र. 2309/2012 मध्ये परिच्छेद 20 मध्ये काही बाबीं स्पष्ट केल्या आहेत. त्याकडे लक्ष वेधण्यात येत आहे.

"The Information Commission does not decide a dispute between two or more parties concerning their legal rights other than their right to get information in possession of a public authority."

उपरोक्त वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार प्रशासकीय स्वरुपाची असल्यामुळे आयोग सदर तक्रार निकाली काढण्याच्या निष्कर्षावर येत आहे.

आदेश

तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ पुणे.

तक्रार क्रमांक - १८ /२०२६/पुणे

जावक क्र- 3628 दिनांक- 4/8/26